**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी थोड्या वेळात उत्तराखंडच्या देहरादूनमध्ये ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन करणार.
2. विकासदर वाढवण्यासाठी देशातल्या संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन.
3. जीबीएस रुग्णांवरील उपचारासाठी विशेष व्यवस्था करा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना.
4. नागपूर शहरातील मनीषनगर इथल्या रेल्वे अंडर ब्रिजचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण होणार.

---------------------------

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या देहरादून इथल्या, महाराणा प्रताप स्टेडियमवर, ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन काही वेळात करणार आहेत. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे पदाधिकारी आणि राष्ट्रीय खेळाडू उपस्थित राहणार आहेत. उत्तराखंडमधल्या आठ जिल्ह्यातल्या अकरा शहरांत १४ फेब्रुवारीपर्यंत ही स्पर्धा चालणार आहे. स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन होण्याआधी २६ जानेवारीला उधमसिंग नगरच्या गोलापूर इथं झालेल्या ट्राय-थलॉन स्पर्धेत मणिपूर आणि महाराष्ट्रानं पदकं जिंकली आहेत.

---------------------------

**मोदी ओडिसा परिषद**

केवळ कच्च्या मालाची निर्यात करून विकासाचा वेग वाढणं शक्य नसून विकासदर वाढवण्यासाठी, संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. भुवनेश्वर इथं, उत्कर्ष ओदिशा- मेक इन ओदिशा कॉनक्लेव्हच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संशोधन आणि नवोन्मेषासाठी एक सशक्त परिसंस्था निर्माण करण्याच्या सरकारच्या वचन बद्धतेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला आणि उद्योगांना या प्रयत्नात सरकारसोबत सहकार्य करण्याचं आवाहनही केलं.

*(होल्ड बाईट - पंतप्रधान ३२ सेकंद)*

*सरकार देश में रिसर्च से जुड़ा एक बहुत वाइब्रेंट इको सिस्टम बना रहा है। इसके लिए एक स्पेशल फंड भी बनाया गया है। इन्टर्नशिप और स्किल डेवलपमेंट के लिए एक स्पेशल पैकेज घोषित किया गया है। इसमें भी इंडस्ट्री खुलकर आगे आये। सरकार के साथ मिलकर काम करें। ये सभी की अपेक्षा है। जितना बड़ा और बेहतरीन भारत का रिसर्च इको सिस्टम होगा, हमारी इंडस्ट्री को इससे सीधा फायदा होगा।*

उत्कर्ष ओदिशा ही, ओदिशा सरकारतर्फे आयोजित केलेली एक प्रमुख जागतिक गुंतवणूक शिखर परिषद असून त्याचा उद्‌देश, ओदिशाला भारतातलं एक आघाडीचं गुंतवणूक केंद्र आणि औद्‌योगिक केंद्र बनवणं असा आहे. दोन दिवसांच्या या परिषदेद्‌वारे, पाच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक व्हावी असं, ओदिशा सरकारचं उद्‌दिष्ट असून यामुळे साडे-तीन लाख रोजगारांची निर्मिती होण्याची शक्यता आहे.

---------------------------

महाकुंभ

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात आतापर्यंत जवळपास १५ कोटी नागरीकांनी पवित्र संगमात स्नान केलं आहे. या मेळ्यात उद्‌या पौष महिन्यातल्या मौनी अमावस्ये निमित्त दुसरं शाही अमृत स्नान होणार आहे. यानिमित्त महाकुंभमेळा क्षेत्रात भाविकांचं आगमन सुरू असून, भाविकांच्या होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर, उत्तर प्रदेश सरकारनं सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. सरकारनं सात-स्तरीय सुरक्षा योजना लागू केली असून, महाकुंभ परिसराला नो-व्हीआयपी झोन घोषित करण्यात आलं असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. तसंच येणाऱ्या भाविक आणि यात्रेकरूंसाठी आरोग्य सेवांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

---------------------------

सलील देशमुख

नागपूर जिल्हा परिषदेच्या आवारात आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून जोरदार आंदोलन करण्यात आलं. जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या विकास कामांच्या वर्कऑर्डर भाजपच्या नेतृत्वातील राज्य सरकारनं थांबविल्याचे आरोप करत हे ठिय्या आंदोलन करण्यात आलं.

*(होल्ड बाईट - सलील देशमुख - २२ सेकंद)*

*आज दोन महिने व्हायला आले, हे सरकार अस्तित्वात आलं, पण तरी आपण पहाल तरीही काम मंजूर देऊन राहिले नाही, आज सांगताना दुर्दैव आहे या*

*जिल्ह्यातले मुख्यमंत्री आहे, या जिल्ह्यातले महसूल मंत्री, पण असा दुजाभाव यापूर्वी कुठलाही काँग्रेस पक्षाचे, राष्ट्रवादी पक्ष असेल, किंवा शिवसेना असेल कुठल्याही नेत्यांनी त्या ठिकाणी आपल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनतेवर केला नाही.*

भाजप राज्य सरकारच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या कामांमध्ये हस्तक्षेप करून राजकारण करत आहे. यात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनतेला विकास निधी आणि आवश्यक कामांपासून वंचित करत आहे असा आरोप, या आंदोलनाच्या माध्यमातून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे. जिल्हा परिषद सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते सलील देशमुख यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं.

---------------------------

लोकसेवा आयोग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ च्या, लेखी परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

---------------------------

गुईलेन बॅरे सिंड्रोम

गुईलेन बॅरे सिंड्रोम अर्थात जी.बी.एस.च्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था निर्माण करावी अशा सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई इथं दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, या आजाराबाबत आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्यात. या आजारावर केले जाणारे उपचार, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट असून, अजून काही प्रक्रिया करायची असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीनं करावी. हा आजार दूषित पाण्यामुळे आणि न शिजवलेले अन्न, मांस खाल्यामुळे होतो. त्यामुळ अशा प्रकारचे अन्न टाळावे, पाणी उकळून पिण्याबाबत नागरिकांना आवाहन करावे. पुण्यात ३१ तारखेला क्रिकेट सामना आहे. त्यावेळी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी अशी सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्य विभागाला केली. बुलडाणा जिल्ह्यातील केस गळती प्रकाराची समस्या नियंत्रणात आली आहे. यात आता नव्यानं रुग्ण वाढ होत नाही. याबाबत आय.सी.एम.आर. कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर, पुढील निर्णय घेण्यात येईल असं सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीनं सांगण्यात आलं.

---------------------------

रेल्वे अंडर ब्रिज

नागपूर शहरातील मनीषनगर इथल्या रेल्वे अंडर ब्रिजचं बांधकाम पूर्ण झालं असून, त्याचं उदघाटन आज सायंकाळी साडेसहा वाजता होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली या रेल्वे अंडर ब्रिजचा उदघाटन सोहळा पार पडेल. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, उदघाटना नंतर लगेचच हा मार्ग नागरिकांसाठी खुला करण्यात येईल. या प्रकल्पाची एकूण लागत, ३३.८३ कोटी रुपये असून, आर.यू.बी.ची लांबी १९० मीटर, रुंदी आठ मीटर आणि उंची चार मीटर आहे. आर.यू.बी.चं निर्माण मुंबई-हावडा आणि दिल्ली-चेन्नई या निरंतर व्यस्त रेल्वे मार्गावर करण्यात आलं आहे. या अंडर ब्रिजमध्ये पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र पादचारी मार्ग देखील, उपलब्ध करण्यात आला आहे.

---------------------------

विधी महाविद्यालय

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या शतकपूर्ती निमित्त आज सायंकाळी 6:45 वाजता, अमरावती रोड स्थित, लॉ कॉलेज परिसरात, कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून याप्रसंगी, या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास शिरपूरकर उपस्थित राहणार असल्याची माहिती या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविशंकर मोर यांनी दिली आहे.

---------------------------

हजरत बाबा ताजुद्दीन

ताजबाग शरीफमध्ये हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांची जयंती, मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टतर्फे शाही दरबारी संदल काढण्यात आला. यानिमित्त शहरातील चौकाचौकांत केक कापण्यात आले. ताजाबादमध्ये नागपूरसह देशविदेशातील भाविक सहभागी झाले होते. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टच्या वतीनं यानिमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होते. यावेळी हजारो भाविकांचा सहभाग होता. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष, प्यारे झिया खान, सचिव ताज अहमद राजा इत्यादी मानवरांच्या उपस्थित जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

---------------------------

महावितरण

अनोळखी क्रमांकावरून वीजबिल भरण्या संदर्भातील येणाऱ्या फ़सव्या संदेशाला बळी पडू नये आणि वीज ग्राहकांना लुटणाऱ्या सायबर स्कॅमरपासून सावध राहण्याचं

आवाहन, नागपूर महावितरणतर्फ़े करण्यात आलं आहे. महावितरणनं कंपनीच्या वेबसाईटवर तसंच ॲपवर फेक मेसेजद्वारे होणारी फसवणूक कशी रोखता येईल याची विस्तृत माहिती दिली आहे. तुमचे वीज बिल अपडेट नसल्याच्या कारणावरून आज रात्री वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. याकरिता ताबडतोब सोबत दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा असे बनावट मेसेज नागरिकांना पाठविण्यात येत आहेत, या बद्दल महावितरण कडून नागरिकांना सतर्क करण्यात येत आहे.

---------------------------

टीबी मुक्त भारत

गोंदिया जिल्ह्यातील अति दुर्गम जंगल व्याप्त प्राथमिक आरोग्य केंद्र, गोठ्णगाव इथं शंभर दिवसीय टीबी मुक्त भारत कार्यक्रम अंतर्गत, निक्षय शिबीर संपन्न झालं असून, या अंतर्गत दहा अति जोखमीच्या सह-व्याधी लोकांची आरोग्य तपासणी सोबतच ९५ लोकांचे निक्षय वाहनद्वारे मोफत, एक्स-रे करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ.देवेंद्र घरतकर यांनी दिली.

---------------------------

नाना पाटोले

विधानसभा निवडणुकीत जनतेवर सवलतींचा वर्षाव करणाऱ्या भाजपा युती सरकारनं सत्तेत येताच जनतेला लुटण्याचं काम सुरु केलं आहे. आधीच महागाईवर नियंत्रण मिळवण्यात भाजपा युती सरकार सपशेल अपयशी ठरले असताना आता राज्यातील सर्वसामान्य जनतेची जीवन वाहिनी असलेल्या एसटीच्या तिकिट दरात १५ टक्के वाढ करून सरकार जनतेला लुटत आहे. ही तिकीट दरवाढ तात्काळ रद्द करावी अशी मागणी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, नाना पटोले यांनी केली आहे.

---------------------------